# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O Office, Palghar

Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


### प्रेसनोट क्र.७६५ दिनांक १६/११/२०२०

### बोईसर पोलीस ठाणे यांचेकडुन जुगार खेळणा-या ६ आरोपीतांवर कारवाई

दिनांक १४/११/२०२० रोजी १६.५० वाजताचे सुमारास बोईसर पोलीस ठाणे हद्दीतील भैयापाडा अहमदनगर मधील के.जी.एन.बेकरीचे मालक समद खान यांच्या चाळीचे मध्यभागी शौचालयाजवळील मोकळया जागेमध्ये, काही इसम जुगार खेळत असल्याची गुप्त माहीती मिळाली होती. मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता आरोपीत १)फारुख्र लतिफ खान वय ३६ वर्ष रा.वापी गुजरात, २)हारुन सुलेमान खान वय ५० वर्ष बोईसर, ३)अमिरअली कासमअली बुधवानी वय ५४ रा.पाम्थळ, ४)नफिस वकार अली वय ३२ रा.यशवंतसृष्टी बोईसर, ५) कल्लु नासिर खान वय ३५ वर्ष रा.बोईसर, ६) मोहंमद जलील दफेदार खान वय ४५ रा.बोईसर यांनी मा.जिल्हाधिकारी सो.पालघर यांचे मनाई आदेशाचा भंग करुन सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन नाकास मास्क न लावता बेकायदेशिरपणे पैशांवर तीन पत्ती जुगार खेळत व खेळवित असतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन ५२,३००/- रुपये रोख्र रक्कम जप्त करण्यात आली असुन आरोपीत यांचे विरुध्द बोईसर पोलीस ठाणे गु.र.नं. II २८८/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ सह महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम ५१ ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप कसबे, प्रभारी अधिकारी, बोईसर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली बोईसर पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner